07-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/06/2025 10:32 PM Page 1



# पर्वरीत जंक्शनवर मुख्य जलवाहिनीला फुटली

## लाखो लीटर पाण्याची नासाडी | पुन्हा जलसंकट, पाणी पुरवठ्यावर परिणाम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. ६ :** पर्वरीला पाण्याचा पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी तिस्क – पर्वरी (जुना बाजार) येथील सुकूर– सांगोल्डा जंक्शनवर भुमिगत वीज वाहिनीच्या खोदकामावेळी गुरुवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास फुटली. यामुळे पर्वरी जलशुध्दीकरण प्रकल्पावर परिणाम झाला आहे. ही जलवाहिनी ४५० एमएमची असून यातूनच पर्वरी जलशुध्दीकरण प्रकल्पाला या पाण्याचा पुरवठा होतो. जलशुद्धीकरण प्रकल्पालाच पाणीपुरवठा करणारी जलवाहिनीच फुटल्याने पर्वरीतील पाणी पुरवठ्यावर त्याचा परिणाम झाला.

तिस्क पर्वरी येथील सुकूर– सांगोल्डा जंक्शनच्या जवळ सांगोल्डाच्या बाजूने वीज खात्यातर्फे भुमिगत वीज वाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या खोदकामावेळी जेसीबीच्या आघातामुळे जलवाहिनी फुटली. ही मुख्य जलवाहिनी असल्यामुळे मोठ्याप्रमाणात पाण्याची नासाडी झाली. यानंतर पाणी पुरवठा विभागाने अस्नोडा जलशुध्दीकरण प्रकल्पापासून पर्वरीला पाणी पुरवठा देणाऱ्या सर्व जलवाहिन्यांचे पाणी बंद केले. मात्र तरीही जलवाहिनीचे पाणी कमी होत नसल्यानंतर ही वाहिनी जलस्त्रोत खात्याची असल्याचे स्पष्ट झाले. नंतर दखल घेत जलस्त्रोत खात्याने जलवाहिनीचे पाणी खंडीत केले. तोपर्यंत दोन तासांचा अवधी गेला होता. त्यामुळे लाखो लीटर पाण्याची नासाडी झाली. पाण्याच्या प्रचंड दाबामुळे पाणी उंच उडताना दिसत होते. वाया गेलेले पाणी तेथील जंक्शनवर तसेच शेतात भरले. फ्लायओवरच्या सुरू असलेल्या कामामुळे सर्वत्र साचलेली माती भरलेल्या पाण्यामुळे चिखलमय झाली होती. परिणामी, रस्त्यावरून वाहने हाकणे धोकादायक ठरत होते. जलवाहिनीतील पाण्याचा विसर्ग झाल्यावर सांयकाळी दुरूस्तीचे काम जलस्त्रोत खात्याकडून हाती घेण्यात येईल. हे दुरूस्तीचे काम शुक्रवारी पहाटेपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असून तोपर्यंत पर्वरी जलशुद्धीकरण प्रकल्पावर अवलंबून असलेल्या भागाला पाणी समस्येला तोंड द्यावे लागणार आहे. काही दिवसांपूर्वी ग्रीन पार्क जंक्शनवर सुरू असलेल्या खोदकामादरम्यान अशाच पद्धतीने पाण्याची वाहिनी फोडण्यात आली होती.



पर्वरी : मुख्य जलवाहिनी फुटल्याने अशाप्रकारे फवारे उडत होते.

## निवडक

### बलात्कारप्रकरणी संशयितास अटक

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ६ :** तिसवाडी तालुक्यात भंगार गोळा करणाऱ्या एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी जुने गोवा पोलिसांनी मूळ कर्नाटक आणि मेरशी येथे राहणारा रवी लमाणी (३१) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी पीडित महिलेने मंगळवार, ४ रोजी तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, पीडित महिला २ रोजी सकाळी ११ दरम्यान मेरशी परिसरात भंगार गोळा करण्यासाठी गेली होती. त्यावेळी संशयित रवी लमाणी या युवकाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. भाडेपट्टीवर घेतलेल्या एका घरात ती राहते. संशयित लमाणीने लैंगिक अत्याचार केल्यानंतर पीडित महिलेला या घट्नेची माहिती कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली होती, असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस निरीक्षक सतीश पडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जस्विटा नाईक यांनी संशयित रवी लमाणी याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४ आणि ३५१(३) अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी संशयिताला अटक केली आहे.

# मडगाव काँग्रेस ब्लॉकची कर वाढीवर तीव्र नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ६ :** मडगाव परिषदेने कर व शुल्कात वाढ केल्याबद्दल मडगाव काँग्रेस ब्लॉकने गुरुवारी तीव्र टीका केली. त्यांनी ही वाढ नागरिकांसाठी अन्यायकारक असल्याचे सांगत, तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. करवाढ फक्त १५ ते २० टक्के असल्याचा दावा करून प्रशासनाने जनतेची दिशाभूल केली आहे. प्रत्यक्ष वाढ ही ५० टक्क्यांपासून थेट ५०० टक्क्यांपर्यंत आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष सावियो कुतिन्हो यांनी केला आहे. याबद्दल मडगावमधील सर्व वॉर्डांमध्ये जनजागृती अभियान राबवण्याचा इशारा काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष सावियो कुतिन्हो यांनी दिला आहे.

सावियो कुतिन्हो व काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी शहरातील विविध ठिकाणी बॅनर लावून नगरपरिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी घरकर हस्तांतरण शुल्कात झालेल्या वाढीचे उदाहरण देत सांगितले की, हे शुल्क ३,००० वरून थेट १०,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहे. ही वाढ फक्त २० टक्के कशी असू शकते? असा सवाल त्यांनी केला.

याशिवाय, जन्म व मृत्यू प्रमाणपत्र शुल्कात १०० टक्के वाढ, व्यापार परवाना शुल्क १,५४७ रुपयांवरून २,५०० ते ६,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहे. तसेच, प्रकाशित साइनबोर्ड (३ चौरस मीटर) साठी शुल्क आता ४,५०० रुपये झाले आहे, तर प्रकाश नसलेल्या साइनबोर्डसाठी २,२५० रुपये आकारले जात आहेत, ही वाढ ३०० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

कुतिन्हो यांनी सांगितले की, सणासुदीच्या काळात नेत्यांच्या प्रचारासाठी लावण्यात येणाऱ्या तात्पुरत्या बॅनर व बोर्डांसाठीच्या शुल्काचा उल्लेख अधिकृत सूचनांमध्ये नाही. ही पक्षपाती भूमिका आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी असेही स्पष्ट केले की, ही वाढ स्थानिक व्यावसायिकांसाठी मोठा धक्का आहे, जे आधीच ऑनलाईन खरेदीमुळे अडचणीत आहेत. अशा प्रकारच्या अवाजवी शुल्कवाढीमुळे अनेक दुकाने बंद पडण्याची शक्यता आहे किंवा व्यवसाय बेकायदेशीर मार्गाकडे वळतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

मडगाव काँग्रेसने ही शुल्कवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी केली असून, मडगावमधील सर्व वॉर्डांमध्ये जनजागृती अभियान राबवण्याचा इशारा दिला आहे. या वाढीचा परिणाम केवळ मडगावकरांवरच नव्हे, तर शहरातील संपत्ती मालकांवरही होणार आहे. जर नागरिकांनी आवाज उठवला नाही, तर भविष्यात आणखी करवाढीचा फटका त्यांना बसू शकतो, असे सावियो कुतिन्हो यांनी सांगितले. त्यांनी नागरिकांना या अन्यायकारक वाढीविरोधात एकत्र येण्याचे आवाहन केले आणि प्रशासनावरील दबाव वाढवण्याचा इशारा दिला. मडगावकरांच्या मौनामुळे भविष्यात घरकर आणखी वाढू शकतो. त्यामुळे वेळेतच विरोध करणे गरजेचे आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

पत्रकार परिषदेत मडगाव काँग्रेसचे नेते सावियो कुतिन्हो, ॲड. स्नेहल ओंस्कर, क्लिफर्ड डायस, लालन पार्सेकर, माथिन करोल, सुजाता पार्सेकर, लिंकन गोम्स, दामोदर ओंस्कर, रॉबर्ट वाझ आणि अन्वर नारू आदी उपस्थित होते.

# हरमल किनाऱ्यावरील आणखी ३ बांधकामे जमीनदोस्त

## २१६ पैकी १५ बेकायदा बांधकामांवर कारवाई केल्याची सचिव कांबळी यांची माहिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ६ :** येथील पंचायत क्षेत्रातील प्रभाग चार मधील गिरकरवाडा व दांडो भागातील तात्पुरत्या पंधरा पैकी उर्वरित ३ बांधकामे गुरुवारी जमीनदोस्त करण्यात आली. यावेळी गटविकास खात्याचे भिवा ठाकूर व अन्य उपस्थित होते.

गिरकरवाडा भागातील बहुचर्चित प्रकरणातील २१६ बांधकामापैकी तीन दिवसांत १५ बांधकामे जमीनदोस्त केल्याचे पंचायत सचिव सुभाष कांबळी यांनी माहिती दिली. तर काहींनी आपली बांधकामे स्वतःहून हटविली असल्याचे त्यांनी सांगितले. जमीनदोस्त करण्याच्या प्रक्रियेस कोणीही हरकत घेतली नाही,त्यांना आवश्यक नोटीस दिली होती. मात्र, अनेकांनी न्यायालयात आव्हान दिल्याचे सूत्रानुसार समजते. यावेळी गटविकास खात्यातर्फे अधिकारी भिवा ठाकूर, अभियंता फटु शेटगावकर व पंचायत कर्मचारी उपस्थित होते.



हरमल : गिरकरवाडा भागातील बांधकामे हटविताना जेसीबी व कामगार.

प्राप्त माहितीनुसार, स्थानिक व्यावसायिकांचा छळ चालविला असून, उदरनिर्वाहासाठी साधन निर्माण करणे गुन्हा असल्यास, परप्रांतीय लोकांच्या बांधकाम व व्यवसायाला अभय का दिले जाते, असा सवाल जमीनदोस्त करण्यात आलेल्यांना केला आहे. न्यायालय व गटविकास खात्याने दिलेल्या आदेशानुसार कारवाई सुरू केली असली तरी मानवी दृष्टिकोनात कारवाईत पक्षपाती असल्याचे काहींनी सांगितले.

दरम्यान, या भागातील एक विहीर बुजवण्यात आल्याने कित्येकांनी संताप व्यक्त केला. त्या विहिरीच्या पाण्याचा अनेक कुटुंबांना लाभ होत होता. आता पाणी टंचाईच्या काळात या भागातील कुटुंबांना वणवण भटकावे लागण्याची शक्यता असून, सरकार जाणूनबुजून कुकर्म करीत असल्याची प्रतिक्रिया एका ज्येष्ठ महिलेने दिली.

# शाळेनंतरच्या अतिरिक्त वर्गांना विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** गोव्यातील विविध शाळांमधील पालक–शिक्षक संघटना (पीटीए) सदस्यांच्या शिष्टमंडळाने पर्वरी येथे शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर यांची भेट घेतली. शालेय वर्षाच्या तारखा एप्रिल ते जून या कालावधीत बदलण्याची विनंती त्यांनी यावेळी केली. पत्रकारांशी संवाद साधताना सेसिल रॉड्रिग्ज यांनी स्पष्ट केले की, १ एप्रिलपासून शाळा सुरू झाल्यास विद्यार्थ्यांना तणावमुक्त होण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार नाही. त्यामुळे या निर्णयावर पुनर्विचार करण्याची गरज आहे.

पालकांनी एप्रिल व मे महिन्यात शिकवले जाणारे अभ्यासक्रम आणि त्यातील उपयुक्तता जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शैक्षणिक उपक्रमांवर आधारित शिक्षणाच्या संकल्पनेचा पर्याय सुचवला, ज्यामुळे शाळेत जाण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनाच हा अभ्यासक्रम करता येईल, तर इतरांवर कोणतीही सक्ती होणार नाही.

शैक्षणिक तासांबाबत अधिक स्पष्टता देण्याची मागणी पालकांनी केली. शिष्टमंडळाने प्रश्न उपस्थित केला की, जेव्हा नववी इयत्तेसाठी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण प्रभावीपणे राबवले जात असेल , तेव्हा अतिरिक्त तासांची गरज का भासते ? पालकांनी स्पष्ट केले की, एनईपी अंतर्गत ब्रिज कोर्स फक्त सहावी इयत्तेसाठी आवश्यक असल्यास इतर विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त तास का घ्यावेत?

एका पालकाने ब्रिज कोर्स जून महिन्यात आयोजित करण्याचा पर्याय सुचवला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक वेळ मिळू शकेल आणि शैक्षणिक दडपण कमी होईल. पालकांनी शिक्षण सचिवांकडे शिक्षणाच्या माध्यमात कोणताही बदल करू नये आणि विद्यमान प्रणाली कायम ठेवावी, अशी मागणी केली.

शिष्टमंडळाने पालक, मुख्याध्यापक, शिक्षक आणि नवीन शिक्षण धोरण तज्ज्ञांचा समावेश असलेल्या विशेष समितीची बैठक बोलावण्याची मागणी केली. शिक्षण व्यवस्थेतील बदलांबाबत सर्व संबंधित घटकांचा समावेश असलेल्या चर्चेच्या माध्यमातून योग्य तो निर्णय घेतला जावा, असे पालकांचे म्हणणे आहे.

# मडगाव पालिकेच्या कचराकुंडीला भीषण आग

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ६ :** मडगाव महानगरपरिषदेच्या इमारतीच्या मागील कचराकुंडीत गुरुवारी सकाळी भीषण आग लागल्याने शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेबद्दल गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ही आग सकाळी ८.३० वाजता लागली आणि तब्बल साडेतीन तासांनंतरही दुपारी १२ वाजेपर्यंत पूर्णतः नियंत्रणात आली नव्हती. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या प्रमाणावर आग लागूनही अग्निशामक आणि आपत्कालीन सेवांना कोणत्याही अधिकाऱ्यांनी किंवा स्थानिक प्रशासनाने तत्काळ माहिती दिली नव्हती. त्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

या घटनेमुळे स्थानिक विक्रेते आणि रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी महापालिकेकडून वेळेवर कचऱ्याची सफाई करण्याची आणि भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासाठी कठोर उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. आम्ही अनेकवेळा अधिकाऱ्यांना येथे कचरा टाकू नये, अशी विनंती केली आहे. हा परिसर पार्किंगसाठीही वापरण्यात येतो आणि आगीच्यावेळी अनेक खाजगी वाहने येथे उभी होती. सुदैवाने, कोणतीही वित्तहानी झाली नाही, पण भविष्यात मोठा अनर्थ होऊ शकतो, असे स्थानिक विक्रेते कृष्णा नाईक यांनी सांगितले. सुदैवाने, आगीत कोणतीही वाहनांची हानी झाली नाही. मात्र, परिसरात उभ्या असलेल्या अनेक खासगी गाड्यांसाठी हा मोठा धोका होता.

विशेष म्हणजे, ही जागा प्रस्तावित बहुस्तरीय पार्किंग प्रकल्पासाठी राखीव आहे. मात्र, सध्या ती कचराकुंडी म्हणून वापरण्यात येते. यापूर्वीही येथे आगी लागण्याच्या घटना घडल्या असूनही, महापालिका नियमितपणे येथे कचरा टाकत आहे आणि त्याचे वर्गीकरण करत आहे. कचरा व्यवस्थापनात कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्याने सांगितले की, आगीबाबत माहिती मिळाल्यानंतरही त्यांनी कोणत्याही संबंधित अधिकाऱ्यांना किंवा अग्निशमन दलाला कळवले नाही.

या घटनेवर प्रतिक्रिया देताना माजी नगरसेवक राजेंद्र आजगावकर यांनी पालिका अधिकाऱ्यांना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले. घरोघरी नियमित कचरा संकलन होऊनही येथे कचरा साचतोच कसा, हा प्रश्न आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून पालिकेने दिवसातून किमान दोन वेळा या भागाची स्वच्छता करावी, असे आजगावकर यांनी सांगितले.

या घटनेमुळे शहराच्या कचरा व्यवस्थापन प्रक्रियेमधील त्रुटी समोर आल्या असून, स्थानिक नागरिक आणि विक्रेत्यांनी त्वरित सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

# लाजर मसीहला अटक; महाकुंभवर हल्ल्याचा कट उधळला

**लखनऊ, दि. ६ :** उत्तर प्रदेशातील कौशांबी जिल्ह्यातून बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या एका सक्रिय दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे. महाकुंभमेळ्यात मोठा दहशतवादी हल्ला घडवण्याच्या तयारीत असलेल्या लाजर मसीहला उत्तर प्रदेश विशेष कार्यदल (एसटीएफ) आणि पंजाब पोलिसांनी गुरुवारी पहाटे संयुक्त कारवाईत ताब्यात घेतले.

उत्तर प्रदेशचे पोलिस महासंचालक (डीजीपी) प्रशांत कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, मसीह प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात मोठा हल्ला घडवण्याच्या तयारीत होता. मात्र, धार्मिक मेळाव्यातील कडक सुरक्षा व्यवस्थेमुळे त्याचा कट अयशस्वी ठरला. त्यानंतर तो बनावट पासपोर्टच्या मदतीने भारतातून पलायन करून पोर्तुगालमध्ये आश्रय घेण्याचा प्रयत्न करत होता. महाकुंभमेळा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारीदरम्यान प्रयागराज येथे पार पडला.

डीजीपी कुमार यांनी सांगितले की, मसीहचा संबंध आधीच बनावट प्रवासी कागदपत्रांच्या मदतीने दुबईला पलायन केलेल्या बब्बर खालसा कार्यकर्त्यासोबत होता. तो पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील कुर्लियन गावाचा रहिवासी असून पाकिस्तानमधील तीन आयएसआय एजंट्सच्या संपर्कात होता. मसीह यापूर्वी शस्त्रास्त्र आणि हेरॉइन तस्करीच्या आरोपाखाली अटक झालेला होता. मात्र, २४ सप्टेंबर २०२४ रोजी अमृतसरच्या गुरु नानक देव रुग्णालयातून तो पळून गेला होता. त्यानंतर २३ ऑक्टोबर २०२४ रोजी पंजाबमधील बटाला येथे बीकेआय मॉड्यूलच्या जर्मन–आधारित प्रमुख स्वरण सिंग उर्फ जीवन फौजीच्या आदेशानुसार त्याने लक्ष्यित गोळीबार केला होता.

मसीह उत्तर प्रदेशात दिसण्यापूर्वी सोनीपत आणि दिल्लीमध्ये लपून बसला होता. तपासात असे उघड झाले आहे की तो पाकिस्तानमधून ड्रोनच्या मदतीने भारतात शस्त्रास्त्र आणि अमली पदार्थांची तस्करी करीत होता. तसेच, पंजाबमध्ये पोलिस ठाण्यांवर हल्ले करणाऱ्या दहशतवाद्यांना ग्रेनेड पुरवत होता. हे ग्रेनेड कोड भाषेत बटाटे या संज्ञेने ओळखले जात होते. उत्तर प्रदेश पोलिसांच्या माहितीनुसार, मसीहचा अजनालातील एका सहकाऱ्याशी संबंध होता, जो अमेरिकास्थित खलिस्तानी दहशतवाद्याशी जोडलेला होता. त्याचबरोबर कतारमध्ये लपून बसलेल्या एका ऑपरेटिव्हशी त्याचा संपर्क होता. एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्मद्वारे हा संवाद साधला जात होता. सध्या एसटीएफच्या सायबर लॅबमध्ये त्याच्या मोबाईल फोन डेटाचे विश्लेषण सुरू आहे.


**VILLAGE PANCHAYAT PENHA DE FRANCA, BRITONA BARDEZ – GOA,**

Ref. No. VP/PDF/006/24-25/ 2223 Dated : 20/02/2025

**APPOINTMENT**

Applications from eligible candidates are invited by the Sarpanch of Village Panchayat Penha de Franca, Bardez Goa for filling up of the following post on regular basis. Interested candidates registered with Employment Exchange in Goa and possessing the required qualifications may apply.

| | | |
|---|---|---|
| 01 | Name of Post | V.P. Clerk |
| | No. of Post | 01 No. (reserved for OBC) |
| | Pay Scale | Pay Band-1 Rs. 5200-20200 + Grade Pay Rs.1900 |
| | Age | Not exceeding 40 years (relaxable for Govt. Servants upto 5 years) (relaxable for Gen/OBC/ST/Govt. servants as per Government circular instruction) |
| | Qualification | Essential :-<br>1. Passed Higher Secondary School Certificate/examination from a recognized Board or equivalent.<br>2. Knowledge of English, Hindi, Konkani & Marathi.<br>3. Minimum 2 year's experience as Clerk<br>**Desirable**<br>1. Should be Computer Literate.<br>2. Typing Speed 40 w.p.m. |
| 02 | Name of Post | V.P. Peon |
| | No. of Post | 01 No. (Unreserved) |
| | Pay Scale | Pay Band-Rs. 4440-7400 + 1300 Grade Pay of 6th CPC |
| | Age | Not exceeding 40 years (relaxable for reserved vacancies in accordance with the instruction or order issued by the Government from time to time) |
| | Qualification | Essential :-<br>1. VIIIth Standard from a recognized school.<br>2. Knowledge of Konkani<br>**Desirable**<br>1. Knowledge of Marathi |

Note:- **1.** Interested and eligible applicant shall submit the application addressed to the Sarpanch, Village Panchayat Penha de Franca, Bardez Goa on or before **24/03/2025,** during office hours giving details such as self attested copies of Educational Qualifications, Work Experience if any, valid employment exchange card, birth certificate, one passport size photograph affixed to the application, 15 years residential certificate, issued by competent authority i.e. office of the Mamlatdar, OBC Certificate issued by competent authority i.e. Dy. Collector & SDO and any other relevant certificate/documents. The application shall be submitted to the office of Village Panchayat Penha de Franca, Bardez Goa. **2.** Late, incomplete application and not fulfilling the requirement in any manner are liable to be rejected summarily by the Office of the Village Panchayat Penha de Franca, Bardez Goa. **3.** Prescribed Educational qualification mentioned above are minimum and mere possession of the same does not entitle the applicant to be called for the oral interview. Where the number of applications received is large, the V.P. office shall shortlist the candidates. **4.** Only eligible candidates fulfilling the criteria as per recruitment rules/advertisement shall apply. The Sarpanch of Village Panchayat Penha de Franca, Bardez Goa reserves the right to cancel the recruitment process at any time without any further notice and without assigning any reason thereof.

Sd/-

Seal ( Sapnil R. Chodankar ) Sarpanch, V. P. Penha De Franca